# मानक क्र.९

**1.2.5 शाळेने पर्यावरण पूरक वृत्ती व जीवनशैलीचा अवलंब करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे.**

## निवडलेला स्तर:२

शाळा दरवर्षी पर्यावरण शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी किमान दोन कार्यशाळा किंवा उद्बोधन वर्ग आयोजित करते.

**१.१ प्रत्येक विद्यार्थ्याला पर्यावरण संवर्धन आणि हवामान बदलाविषयी पुरेशी जागरूकता संपादन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला पर्यावरण संवर्धन आणि हवामान बदला विषयी पुरेशी जागरूकता संपादन करण्यासाठी पर्यावरण या विषयाच्या अंतर्गत विविध कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते.

**२.१ शाळा दरवर्षी पर्यावरण शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी किमान दोन कार्यशाळा किंवा उद्बोधन वर्ग आयोजित करते.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात पर्यावरण शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत परिवर्तन करण्यासाठी आणि पर्यावरण पूरक जीवनशैली अंगी करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.

साप्ताहिक स्वराज्य गर्जना
मंगळवार दि.१७ ते २४ जानेवारी २०२३

# इंदिरा महाविद्यालयात उत्साहात भूगोल दिवसाचे आयोजन



कळंब – स्थानिक इंदिरा महाविद्यालयात भूगोल दिवसाचे आयोजन उत्साहात वसुंधरा भूगोल अभ्यास मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. श्रीमती सरोज लखदिवे अध्यक्ष म्हणून होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगांवचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर ठाकरे तसेच प्रा. निलकंठ नरुले भूगोल विभाग प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकातून प्रा. नरुले यांनी विद्यार्थ्यांना सूर्याचे धनु राशीतून मकर राशीत संक्रमण होते यालाच मकर संक्रांत असे म्हणतात हा दिवस ज्येष्ठ भूगोल तज्ञ सी.डी. देशपांडे यांचा जन्मदिन हा भूगोल दिवस म्हणून साजरा करण्यात येतो, हा एक अतिशय महत्त्वाचा प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितला. प्रमुख पाहूणे डॉ. ठाकरे यांनी आपल्या भाषणातून भूगोल विषयाचे महत्त्व आणि भूगोलातील अनेक घडामोडींचा वृत्तांत तसेच पर्यावरणा संबंधात आणि पर्यावरण कसे चांगले ठेवता येईल याबद्दल अमूल्य असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सरोज लखदिवे यांनीही विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन करण कुहीते यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.श्रद्धा गायकवाड हिने मानले. हा कार्यक्रम वसुंधरा भूगोल अभ्यास मंडळाच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी केला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ इंगळे, प्रा. शितल राऊत, डॉ. राखुंडे आणि भूगोलाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

---

नवजीवन

# इंदिरा महाविद्यालय कळंब, येथे वृक्ष संवर्धनाचा कार्यक्रम संपन्न

नवजीवन, ब्युरो

**यवतमाळ** : स्थानिक, इंदिरा महाविद्यालय कळंब येथे वृक्षांना राखी बांधून वृक्ष संवर्धनाचा कार्यक्रम संपन्न झाला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष महत्वाची कामगीरी बजावत असतात.

परंतु, अलीकडे पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस बिघडत चालला आहे, अशा परिस्थितीमध्ये वृक्षारोपण करणे ही, काळाची गरज बनली आहे. झाडे हे आपल्या निसर्गाचा महत्वाचा घटक आहे. वृक्ष आपल्या निसर्गाची शोभा वाढवतात. आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी झाडे महत्वाची भूमिका बजावत असतात. अनेक वृक्षांमध्ये तर औषधी गुणधर्म आहेत. पर्यावरणाला निसर्गाला झाडांमुळे सौंदर्य प्राप्त होते. परंतु वृक्षांची तोड मोठया प्रमाणात झाल्यामुळे आजुबाजूचे वन क्षेत्र कमी झाले आहे. आणि म्हणून वृक्षारोपणा सोबतच, वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

या पार्श्वभूमीतून विद्यार्थी व शिक्षकांनी वृक्षांना राखी बांधून वृक्षसंवर्धनाची जबाबदारी विद्यार्थी व शिक्षकांनी स्विकारली. हा कार्यक्रम वाणिज्य विभाग, गृहअर्थशास्त्र विभाग, रसायनशास्त्र विभाग तसेच शारीरिक शिक्षण विभागातर्फे घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा. रेखा वाठ, प्रा. डॉ. माधुरी राखुंडे, प्रा. सरोज लखदिवे, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा. डॉ. डी. एम. चव्हान, प्रा. शितल राऊत, अर्चना भोयर तसेच महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यायनी सहभाग नोंदविला.

**पर्यावरण विषयाच्या अंतर्गत विविध कार्यक्रम**







**पर्यावरण पूरक वृत्ती व जीवनशैली बाबत जागृती कार्यशाळा**